# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांकः- ६९-२२** **दिनांक - ०१/०३/२०२२**

## जादुटोना करुन महिलेवर लैंगिक अत्याचार करणा-या आरोपीतांना अटक.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २६/०२/२०२२ रोजी १२.३० वाजता ते ०१.३० वाजताचे दरम्यान राशिद कंम्पाऊन्ड, गवराईपाडा नाका, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर येथील एका चाळीतील गाळयामध्ये तक्रारदार महिला यांना काळी जादु उतरविते असे सांगुन त्यांचेवर जादुटोना करण्याच्या बहाण्याने त्यांचेवर जबरी संभोग करुन जिवे मारण्याची धमकी दिले बाबत फिर्यादी- वय-२० वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपीत-१) मौलाना रज्जब शेख, २) शहाबुद्दीन यांचेविरुध्द पेल्हार पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. I १८१/२०२२ भा.दं.वि.सं.कलम-३७६ (ड), ५०६ सह जादुटोना प्रतिबंध अधिनिय कलम- ३ प्रमाणे दिनांक २६/०२/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी यातील आरोपीतांना अटक करण्याबाबत दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळावर भेट देवुन गुन्हयातील आरोपीतांबाबत माहिती घेतली असता ते राहते ठिकाण सोडून पळुन गेल्याची माहिती मिळाल्याने, लागलीच आरोपीतांचा कसोशिने शोध घेवुन आरोपीत नामे. १) रजब अल मो. इसहाक शेख, वय-२७ वर्षे, रा. नालासोपारा (पु.), ता. वसई, २) शहाबुददीन अकबर अली शेख, वय-५० वर्षे, रा.नालासोपारा (पु.), ता. वसई हे पळुन जाण्याच्या तयारीत असतांना त्यांना पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीरित्या ताब्यात घेवुन त्यांचे चौकशीत माहिती समजुन आली की ते प्रताडीत महिलांना तुमचेवर असलेली काळी जादु उतरुन, त्रासातुन मुक्त करुन देतो अशी अमिषे देवुन, जादुटोना करण्याच्या बहाण्याने महिलांवर लैगिंक अत्याचार करत होते. नमुद आरोपीतांना दिनांक २७/०२/२०२२ रोजी सदर गुन्हयात अटक केली आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सहायक पोलीस निरीक्षक/शशिकांत अवघडे व गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, पोना/तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, शरद जावळे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, सागर वाकचौरे, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

---०००---